**आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता मार्गदर्शक तत्वांबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः स्थाविका -०४२५/ प्र. क्र.४२/ ई - १५८२००३ / का. १४८२**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २० एप्रिल, २०२६**

**संदर्भ:-** (१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०५१६/ प्र.क्र.७९ /का.१४८२, दिनांक २१ जून, २०१६
(२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६ /का.१४८२, दिनांक १२ जुलै, २०१६
(३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०५१६/ प्र.क्र.७९ /का.१४८२, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२०
(४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०९२२/ प्र.क्र.११८ /का.१४८२, दिनांक २८ डिसेंबर,२०२२
(५) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांकः स्थाविका-०४२५/ प्र.क्र.४२ /का.१४८२, दिनांक २८ एप्रिल,२०२५

**प्रस्तावना:-**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या कामांच्या व्याप्ती आणि कार्यपध्दती यामध्ये अध्ययन करून अधिक गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता अभ्यास करून अंतिम निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय दिनांक ७ जून, २००६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत अ.क्र. ९ अन्वये घेण्यात आला होता. त्यानुसार संदर्भाधिन क्र. १, ३, ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. सदरहू मंत्रीमंडळ उपसमिती नव्याने गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या कामांच्या व्याप्ती आणि कार्यपध्दतीचे अध्ययन करून अधिक गतिमान पध्दतीने कामे होण्याकरिता मा. मुख्यमंत्री ( वित्त व नियोजन ) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात येत आहे : -

| अ.क्र. | मंत्रिमंडळ उपसमिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. मुख्यमंत्री ( वित्त व नियोजन ) | अध्यक्ष |
| २. | मा. मंत्री (महसूल) | सदस्य |
| ३. | मा. मंत्री (शालेय शिक्षण) | सदस्य |
| ४. | मा. मंत्री (उद्योग) | सदस्य |
| ५. | मा. मंत्री ( कृषी ) | सदस्य |
| ६. | मा. मंत्री ( महिला व बालविकास ) | सदस्य |
| ७. | मा. मंत्री ( ग्रामविकास व पंचायत राज ) | सदस्य |
| ८. | मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) | सदस्य |

२. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये वेळोवेळी सुचविण्यात येणारे सुधारणा / बदल करणे तसेच नविन बाबी समाविष्ट करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल. मंत्रीमंडळ उपसमितीची बैठक अध्यक्ष, यांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०४२०१७००४९८४१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NITIN BHANUDAS KHEDKAR

Digitally signed by NITIN BHANUDAS KHEDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=99977b58556463dbb2db463cec9482d13f7661ed3b2a95e83e386485fff4c21e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CFCA827F49093860DB8AA4627DA10E31F82BD40A9631D2E01EC212A473A6BCA2, cn=NITIN BHANUDAS KHEDKAR
Date: 2026.04.20 17:02:06 +05'30'

**( नि. भा. खेडकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत अग्रेषित:-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा / मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री ( नगरविकास ) यांचे सचिव,
५. मा. उप मुख्यमंत्री ( रा. उ. शुल्क ) यांचे सचिव,
६. मा. मंत्री ( सर्व ) यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्यमंत्री ( सर्व ) यांचे खाजगी सचिव,
८. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व),
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
१०. मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव ( सर्व ),
११. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. विभागीय आयुक्त, ( सर्व ),
१३. जिल्हाधिकारी, ( सर्व ),
१४. नियोजन विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव,
१५. सर्व सह आयुक्त ( नियोजन ), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
१६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१७. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई,
१८. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
२०. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
२३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२४. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६. निवड नस्ती/का-१४८२, मंत्रालय, मुंबई.